SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25
NOTES-4(TERM-)

Std. : 4th Subject: Marathi
Prepared by: Pallavi Surve पाठ ११. वाळू आणि खडक

**पूर्व उपक्रम**- तुमच्या मित्राविषयी थोडक्यात माहिती लिहा.

**शब्दार्थ**

१.कुरबुर = वाद २.चिरकाल = खूप वेळ

३.पश्चाताप होणे = चुकीची जाणीव होणे ४. क्षणिक =थोड्यावेळा पुरते, तात्पुरते

५.क्षमा = माफी ६.दृढ = घट्ट

७.विसावणे = थांबणे ,विश्रांती घेणे

**अ) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. साहिलने वाळूवर बोटाने काय लिहिले?

उत्तर- "आज माझ्या मित्राने मला मारले", असे साहिलने वाळूवर बोटाने लिहिले.

२. साहिलने खडकावर काय लिहिले ?

उत्तर - साहिलने खडकावर लिहिले ,"आज माझ्या मित्राने माझे प्राण वाचवले".

३. साहिलचे प्राण कोणी वाचवले?

उत्तर- अथर्वने साहिलचे प्राण वाचवले.

४. या कथेचे तात्पर्य काय आहे?

उत्तर- या कथेचे तात्पर्य म्हणजे "क्षणिक वाद ,भांडणे, अपमान या गोष्टी वाळूवरील अक्षराप्रमाणे विसरून जाव्यात आणि ज्या गोष्टी छान आहेत अशा गोष्टी आपली मैत्री दृढ करतील, त्या गोष्टी मनात खडकांवरील अक्षराप्रमाणे कोरून ठेवाव्यात."

**आ) समानार्थी शब्द लिहा.**

१. क्षमा = माफी २.पश्चाताप = चुकीची जाणीव होणे

३.कुरबुर = वाद ४.क्षणिक = तात्पुरते

५.दृढ = घट्ट

**इ)विरुद्धार्थी शब्द लिहा**.

१. मित्र X शत्रू २. खाली X वर

३.जोरात X हळू

**ई) पुढील वाक्य योग्य विरामचिन्हे वापरून लिहा.**

१. मला आंबा आवडतो

उत्तर-मला आंबा आवडतो .

२.तुझे नाव काय आहे

उत्तर-तुझे नाव काय आहे ?

३.अनिल गौरव मयूर वरून अक्षय हे माझे मित्र आहेत

उत्तर-अनिल, गौरव, मयूर, वरून ,अक्षय हे माझे मित्र आहेत.

४. अबब केवढा मोठा साप आहे

उत्तर-अबब ! केवढा मोठा साप आहे.

**उपक्रम** - मुद्द्यावरून गोष्ट तयार करा. ( पाठ्यपुस्तक पान क्रमांक ४०.)

S.TEACHER HOD COORDINATOR PRINCIPAL